आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ ऑगस्ट २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फिजीचे प्रधानमंत्री सितिवेनी राबुका यांच्यात द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्यासंबंधी चर्चा, विविध सामंजस्य करारावर स्वाक्षरी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या २६ लाख अपात्र लाभार्थ्यांची छाननी होणार, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

राज्यातल्या ३ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

भारतीय जनता पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदी अमित साटम यांची नियुक्ती

उत्तर प्रदेशात रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू, ४५ जण जखमी

**आणि**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारोत्तोलनात भारताला दोन सुवर्णपदकं

**<><><><>**

भारत आणि फिजी या दोन देशांमध्ये एक महासागर असला, तरी या दोन्ही देशांच्या आकांक्षा एकत्र प्रवास करतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. त्यांनी आज फिजीचे प्रधानमंत्री सितिवेनी राबुका यांची भेट घेतली आणि दोन देशांमधली मैत्री आणखी बळकट कशी करता येईल, यावर चर्चा केली. या भेटीनंतर दोन्ही नेत्यांनी माध्यमांसमोर संयुक्त निवेदन दिलं. आरोग्य, संरक्षण, शिक्षण, संस्कृती, हवामान बदल इत्यादी क्षेत्रांमध्ये एकत्र काम करायला दोन्ही देशांनी सहमती दर्शवल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितलं.

फिजीची राजधानी सुवा इथं भारत १०० खाटांचं सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधेल, डायलिसिस युनिट आणि रुग्णवाहिका पाठवेल, तसंच जनऔषधी केंद्र उभारेल. सायबर सुरक्षा आणि डेटा प्रोटेक्शन या क्षेत्रांमध्ये फिजीला मदत करेल, असं या बैठकीत ठरल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

संरक्षण क्षेत्रातही दोन्ही देशांमधलं परस्पर सहकार्य बळकट करायला दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असून याबाबतचा आराखडा तयार करण्यात आला आहे. फिजीची सागरी

सुरक्षा बळकट करण्यासाठी भारत प्रशिक्षण आणि सामग्रीची मदत करेल, असंही मोदी यांनी सांगितलं. तत्पूर्वी, दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी सात सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

<><><><>

१३० व्या घटना दुरुस्ती विधेयकाविरुद्धच्या निदर्शनं केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज विरोधी पक्षांवर टीका केली. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत, शहा यांनी आरोप केला की विरोधी पक्षांचे नेते तुरुंगात असतानाही सरकार स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे विधेयकाविरुद्ध केलेली निदर्शनं लोकशाही विरोधी आहेत, असं शहा म्हणाले. या कायद्याच्या कक्षेत प्रधानमंत्र्यांना आणण्याचा आग्रह प्रधानमत्री नरेंद्र मोदी यांनीच केल्याचंही त्यांनी सांगितलं.

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या राजिनाम्याबाबत विचारलं असता हा विषय आणखी न ताणण्याचं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या २६ लाख लाभार्थ्यांची छाननी करण्याचे आदेश राज्य सरकारनं जिल्हा पातळीवरच्या यंत्रणेला दिले आहेत. सर्व जिल्ह्यातले हे लाभार्थी अपात्र असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान विभागानं कळवलं आहे. त्यांची प्रत्यक्ष छाननी करण्याचे आदेश महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. छाननीनंतर त्यांची पात्रता-अपात्रता ठरणार आहे. अपात्र लाभार्थ्यांवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं आहे.

<><><><>

केंद्र सरकारनं राज्यातल्या ३ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर केले आहेत. त्यात नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन, लातूरचे डॉ. संदीपान जगदाळे आणि मुंबईतल्या सोनिया कपूर यांचा समावेश आहे. डॉ. शेख नांदेडमधल्या अर्धापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत तर जगदाळे लातूरच्या दयानंद कॉलेजात शिकवतात. कपूर या मुंबईतल्या अणूऊर्जा महामंडळाच्या शाळेत शिक्षिका आहेत. ५० हजार रुपये आणि रजत पदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

<><><><>

भारतीय जनता पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा कार्यालयात आज झालेल्या वार्ताहर परिषदेत मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडनवीस यांनी ही घोषणा केली. मावळते अध्यक्ष आशीष शेलार यांच्या कारकीर्दीत भाजपाने अनेक महत्त्वपूर्ण निवडणुका जिंकल्या आणि मुंबईत पक्षाचं अस्तित्व निर्माण केलं असं फडनवीस म्हणाले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर मुंबईला नवा अध्यक्ष द्यावा, देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार अमित साटम यांची निवड प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

जागतिक आर्थिक मंदी आणि भू-राजकीय तणावामुळे आव्हान निर्माण झाल्यामुळे आर्थिक स्थैर्य आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी चलनविषयक धोरणाची भूमिका महत्त्वाची असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले. फिक्की आणि इंडियन बँक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या फिबॅक या वार्षिक परिषदेला ते संबोधित करत होते. प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये आलेली मंदी आणि पुरवठा साखळीतला व्यत्यय या दरम्यान, नव्या संधीचा शोध घेणं महत्त्वाचं असल्याचंही मल्होत्रा म्हणाले. अमेरिकेबरोबर करवाढी संदर्भातल्या वाटाघाटी यशस्वी होतील आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा नगण्य परिणाम होईल, अशी आशा अजूनही असल्याचं ते म्हणाले.

**<><><>**

उत्तर प्रदेशात बुलंदशहर इथे भाविकांनी भरलेला ट्रॅक्टर आणि कंटेनरमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला तर ४५ जण जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग ३४ वर घाटाल इथे काल रात्री हा अपघात झाला. हा ट्रॅक्टर कासगंजकडून राजस्थानात गोगामेडी इथं जात होता. या ट्रॅक्टरमध्ये ६१ प्रवासी प्रवास करत होते. वेगाने येणाऱ्या कंटेनरने या ट्रॅक्टरला मागून धडक दिल्याने तो उलटून हा अपघात झाला. जखमींना खुर्जा इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यातल्या तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><>**

भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयानं विकसित केलेल्या “मेरी पंचायत” मोबाईल अॅप्लिकेशनला, जिनिव्हा इथं झालेल्या जागतिक शिखर परिषदेत पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. दोन लाख ६५ हजार ग्रामपंचायती आणि ९५ कोटी ग्रामीण नागरिकांना या ॲपचा फायदा होतो. २५ लाखांहून अधिक प्रतिनिधींसाठी हे एक सक्षम व्यासपीठ असून, या ॲपवर ग्रामपंचायत स्तरावर बजेट, योजना, पायाभूत सुविधा, सेवांची माहिती आणि हवामान अंदाज आदींबाबत माहिती मिळते. १२ हून अधिक प्रादेशिक भाषांमध्ये हे ॲप उपलब्ध आहे.

<><><><>

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं आज लखनऊ इथे त्यांच्या मूळ गावी भव्य स्वागत करण्यात आलं. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक आणि लखनऊच्या महापौर सुषमा खरकवाल यांनी त्यांचं लखनऊ विमानतळावर स्वागत केलं. शुभांशु यांनी त्यांच्या शाळेत आयोजित केलेल्या विजयी संचलनात सहभाग घेतला, त्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. या संचलनावेळी शाळकरी मुलांनी तसंच स्थानिकांनी शुक्ला यांच्यावर फुलांचा वर्षाव केला आणि तिरंगी झेंडे फडकावले. आज संध्याकाळी उत्तर प्रदेशच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने आयोजित केलेल्या समारंभात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते शुभांशु शुक्ला यांचा सत्कार करण्यात येईल.

<><><><>

गुजरातमधे अहमदाबाद इथं तिसाव्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत आज पहिल्याच दिवशी भारतानं दोन सुवर्णपदकांची कमाई केली. महिलांच्या भारोत्तोलनात स्नॅच आणि क्लिन अँड जर्क प्रकारात ४४ ते ४८ किलो वजनी गटात प्रितीस्मिता भोईनं एकूण दीडशे किलोग्रॅम वजन उचलत पदक पटकावलं, तर पुरुषांच्या भारोत्तोलन प्रकारात धर्मज्योती देवघरियानं एकूण २२४ किलोग्रॅम वजन उचलत पदक मिळवलं.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत फ्रान्सच्या बेंजामिन बोंजी यानं १३व्या मानांकित दानील मेदवेदेवला पराभवाचा धक्का दिला.

काल रात्री झालेल्या अटीतटीच्या सामन्यात त्यानं मेदवेदेवचा ६-३, ७-५, ६-७, ०-६, ६-४ असा पराभव केला. दुसऱ्या सामन्यात नोव्हाक जोकोविच यानं लर्नर टिएन

याच्यावर ६-१, ७-६, ६-२ अशी सहज मात केली. महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंका हिनं रेबेका मासारोव्हा हिच्यावर ७-५, ६-१ असा सरळ सेट्समध्ये विजय मिळवला.

**<><><>**

नांदेड - मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसचं उद्घाटन उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते होणार आहे. फडनवीस हे हुजूर साहिब नांदेड इथून या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवतील. नांदेड ते मुंबई दरम्यानचं ६१० किलोमीटरचं अंतर ही गाडी साडे नऊ तासांत पूर्ण करेल.

**<><><>**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मोर्चा २७ ऑगस्टला मुंबईकडे निघणार आहे. हा मोर्चा जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटी इथून निघून शहागड, तुळजापूर, पैठण, शेवगावमार्गे पुढे जाणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काही मार्गांवरच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, बिडकीन, पैठणमार्गे शेवगावकडे जाणारा आणि येणारा मार्ग, तसं शहागड, नवगावमार्गे पैठणकडे जाणारा आणि येणारा मार्ग २८ तारखेला संध्याकाळपर्यंत बंद राहणार असून, नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन वाहतूक पोलिसांनी केलं आहे.

**<><><>**

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी भूखंड प्रकरणात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याचा आरोप, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रकरणी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शिरसाट यांच्यावर कारवाई करुन, त्यांना मंत्रीपदावरुन हटवण्याची मागणी रोहीत पवार यांनी केली.

**//<><><><>//**